महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे-४११००५
email:-trg२२३०.ropune@dvet.gov.in Phone No.२५५३५४१५/१६/१७ Fax (वैय ) २५५३३५०२


जा.क्र.प्राकापु/प्रशि/प्रवेश-२०२१/क-१/प्र.क्र १०३/ 5872 दिनांक :- 30 SEP 2021

महत्वाचे

ई-मेलद्वारे

प्रति,

प्राचार्य,

शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,

(पीपीपी योजनेअंतर्गत) व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था,

(पुणे विभागातील सर्व).

विषय :- प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना राबविणे बाबत

संदर्भ :-१. कौशल्य विकास, व उदयोजकता विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.आयटीसी -२२१७/प्र.क्र.९९/व्यशि-३, दिं-०९/०९/२०२१

२. कौशल्य विकास, व उदयोजकता विभाग शासन निर्णय क्र.आयटीसी -२२१७/प्र.क्र.९९/व्यशि-३, दिं-२९/०५/२०१९

३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग , शासन निर्णय क्रं.व्यप्रशु-२०१९/प्र.क्र १७३/शिक्षण -१, दिं.०१/०८/२०१९

४. आदिवासी विकास विभाग ,शासन निर्णय क्रं.आविवि-२०१९/प्र.क्र.७४/का-१२, दिं. २९/०७/२०१९

५. कौशल्य विकास, व उदयोजकता विभाग शासन निर्णय क्रं.आयटीआय-२०१९ प्र.क्र.५७/व्यशि-३, दिं-२०/०९/२०१९

६. या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.प्राकापु/प्रशि/क-४/महाडीबीटी/५५८८, दिं.१६/०९/२०२१

७. या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.प्राकापु/प्रशि/प्रवेश-२०२१/क-१/प्र.क्रं १०३/५७८७, दिं.२७/०९/२०२१

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे असे निर्दशनास आले आहे की , प्रशिक्षण शुल्क प्रतीपूर्ती योजनेचा लाभ प्रशिक्षणार्थी अल्प प्रमाणात घेत आहे , तसेच लोक प्रतिनिधी खाजगी संस्थाचे प्रतिनिधी , पालक , प्रशिक्षणार्थी सदर योजनेबाबत वारंवार विचारणा करतात. प्रशिक्षण शुल्क प्रतीपूर्ती योजनेबाबत कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना नाही तसेच स्थानिक पातळीवर सदर योजनेबाबत मार्गदर्शन तसेच माहिती उपलब्ध होत नाही त्यामुळे सदर योजनेचा लाभ गरजू प्रशिक्षणार्थी पर्यंत पोहोचत नाही. सबब सदर योजनेबाबत सविस्तर पणे पुन:श्च आपणास अवगत करण्यात येत आहे.

१. शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत अभ्यासक्रमासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजनेअंतर्गत (पीपीपी) प्रवेशासाठी उपलब्ध जागा व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध जागांवर केंद्रियऑनलाईन पध्दतीने (centralized online admission process) प्रवेश घेतलेले प्रशिक्षणार्थी पात्रतेचे इतर निकष पुर्ण करित असल्यास पात्र आहेत.

२. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्यवस्थापन कोटयातील जागांवर (management sheet) व संस्थास्तरावर भरण्यात येणाऱ्या जागांवर (institute level seats) प्रवेश घेणारे प्रशिक्षणार्थी सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र नाहीत.

३. प्रवेश घेतलेल्या तुकडयांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (ncvt) अथवा राज्यव्यवसाय प्रशिक्षण परिषद (scvt) यांची संलग्नता (affiliation) आवश्यकआहे

४. प्रशिक्षणार्थ्यांने यापूर्वी शासकिय अथवा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला नसावा. म्हणजेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रथमच प्रवेश घेणारे प्रशिक्षणार्थी पात्र आहेत.

५. प्रशिक्षणार्थ्यांने केंद्र अथवा राज्य शासनाच्या अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण /कंपन्या /महामंडळे यांनी पूरस्कृत केलेल्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा या पूर्वी लाभ घेतलेला नसावा.

६. प्रशिक्षणार्थी हा महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र धारक असावा.

७.सदर योजनेचा लाभ हा कुंटंबातील केवळ पहिल्या दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहिल, तिसऱ्या व त्यापुढील कुटुंबातील अपत्याला सदर योजनेचा लाभ अनुज्ञेयय असणार नाही. सदरबाबत लाभ मंजूर करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी शिधावाटप पत्रिका किंवा अन्य शासनमान्य कागदपत्रांची पडताळणी करुन खात्री करावी, तसेच याबाबत पालकांचे हमीपत्र घेण्यात यावे.

योजनेअंतर्गत दिले जाणारे लाभ-

१. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृ्टया दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुंटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा कमी असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील अभ्यासक्रमासाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहिल.

२. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुंटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा जास्त व रु. ८ लाखापर्यंत असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील अभ्यासक्रमासाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या ८० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहिल.

३. इयत्ता १० वी अनुत्तीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुंटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८ लाखापर्यंत आहे व इयत्ता १० वी उत्तीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुंटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५१ लाख ते रु. ८ लाखापर्यंत असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील अभ्यासक्रमासाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहिल.

४. इयत्ता १० वी उत्तीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेस पात्र आहेत.

५. दिव्यांग प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहिल.

<u>आवश्यक कागदपत्रे</u>

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रवेशपध्दती , नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती माहिती पुस्तिकेतील प्रपत्र -३ प्रवेशाकरीता आवश्यक कागदपत्रांची यादी या मध्ये देण्यात आलेले व संबंधित प्रशिक्षणार्थ्याच्या प्रवर्गानूसार आवश्यक सर्व कागदपत्रे व त्या व्यतिरिक्त खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. आधार नोंदणी कार्ड

२.प्रशिक्षणार्यांचे नाव समाविष्ट असलेले रेशनकार्ड

३. महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

४. पालकांचा उत्पन्नाचा दाखला

५.जातीचा दाखला

६. जात वैधता प्रमाणपत्र

७. दिव्यांग प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांकरिता वैद्यकीय मंडळाकडून दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र ज्यात अपंगत्व कायमस्वरुपी असून त्याचे प्रमाण ४० टक्के पेक्षा जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख आहे.

**सदर योजनेबाबत सर्व माहिती आपल्या संस्थेच्या दर्शनी भागात प्रसिध्द करण्यात यावी. तसेच स्थानिक पातळीवरील वृत्तपत्रे / सोशल मिडीया / केबल नेटवर्क वर भरपूर प्रसिध्दी देणेत यावी.**

( वाय.पी . पारगावकर)
सहसंचालक